# संशोधन संचालनालय
## वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

जा. क्र.:डीओआर/डीडीआर/सी/6492/2016 दिनांक : 31.12.2016

## परिपत्रक

**वनामकृविच्या वतीने डिसेंबर 2017 मध्ये औरंगाबाद येथे "जागतिक वातावरण बदल : शेती व जल क्षेत्रावर होणारे परिणाम" या विषयावर आंतरराष्ट्रीय परिसंवाद**

महाराष्ट्र राज्यातील परभणी येथील वसंतराव नाईक कृषि विद्यापीठ, परभणी, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जल व भूमी व्यवस्थापन संस्था, औरंगाबाद आणि कृषि संशोधन व तंत्रज्ञान, नियतकालिक, पुणे, यांच्या संयुक्त विद्यमाने डिसेंबर 14-16, 2017 दरम्यान या आंतरराष्ट्रीय परिसंवादाचे औरंगाबाद येथे आयोजन करण्यात आले आहे. **या आंतरराष्ट्रीय परिसंवादामध्ये वातावरण बदल व परिवर्तनशीलता व प्रक्रिया, शेतीवरील परिणाम, हवामान बदलास जुळवून घेण्याची प्रक्रिया, हवामान बदलाची तीव्रता कमी करणे, हवामान बदल व जलसाठे, जनावरे व माश्यामध्ये हवामान बदलास जुळवून घेण्याची प्रक्रिया, वातावरण बदल व वारंवारता, आपत्ती व्यवस्थापन, पावसातील खंड, वातावरणातील उच्च घटना, हवामान बदलानुसार शेती, अल्पभुधारक शेतकऱ्यांनी हवामान बदलास सक्षम होणे, दुष्काळ, अतिवृष्टी, गारपीट या विषयावर उहापोह होणार आहे.** महाराष्ट्रातील विशेषतः मराठवाडा, विदर्भ, खानदेश, पश्चिम महाराष्ट्रातील काही जिल्हे तसेच कर्नाटक, मध्य प्रदेश, तामिळनाडू, आंध्र प्रदेश, तेलंगणा, केरळ याबरोबरच युरोपातील अनेक राष्ट्रांमधून या समस्या अलीकडच्या काळात वारंवार अनुभवास येत असल्याने त्यांचा कृषी उत्पादनावर, जलसाठ्यांवर अनिष्ठ परिणाम होऊन शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान दिवसेंदिवस वाढतच आहे. या पार्श्वभूमीवर आंतरराष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे.

सदरील आंतरराष्ट्रीय परिसंवादास भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे माजी महासंचालक, प्रख्यात शास्त्रज्ञ आणि पदम्भूषण डॉ. राजेंद्रसिंह परोडा, आंतरराष्ट्रीय कोरडवाहू संस्थेचे (इक्रिसॅट) महासंचालक डॉ. डेव्हीड बर्गव्हिन्सन, डॉ. राम खर्चे, उपाध्यक्ष, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे, यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. परिसंवादाच्या आयोजन समितीमध्ये डॉ. बी. वेंकटेश्वरूलू, कुलगुरू, वसंतराव नाईक कृषि विद्यापीठ, परभणी, डॉ. आर. जी. दाणी, कुलगुरू, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला, डॉ. तपस भट्टाचार्या, कुलगुरू, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, डॉ. के. पी. विश्वनाथा, कुलगुरू, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांचा समावेश असुन सल्लागार समितीमध्ये श्रीलंका, जर्मनी, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया येथील प्रख्यात शास्त्रज्ञ व देशातील विविध कृषि विद्यापीठांचे कुलगुरूचा समावेश आहे. परिसंवादामध्ये आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय ख्यातीचे संशोधक, अशासकीय संस्थां, विद्यार्थी तसेच प्रगतीशील शेतकरी सहभागी होणार आहेत.

**या आंतरराष्ट्रीय परिसंवादाचे व्यवस्थापन करण्यासाठी सल्लागार समिती आणि आयोजन समितीचे गठण करण्यात आले असुन या आंतरराष्ट्रीय परिसंवादासंबंधी संपुर्ण माहिती www.ccaw2017.org या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.** असे वनामकृविचे संचालक संशोधन तथा मुख्य आयोजक डॉ. दत्तप्रसाद वासकर यांनी कळविले आहे.

**आयोजक तथा**
**संचालक संशोधन**
**वनामकृवि, परभणी**